# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२३/०७/१७
## दि.२२/०७/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे २४५/१७,भादविक ३०७.३७ भा.ह.का.क ४,२५.मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३).१३५ |
| **फिर्यादी** | सुसधर सरकार,वय-२३ वर्षे,रा.लेबर कॅम्प,राजर्षी शाहु बस स्थानक मागे ,स्वारगेट,पुणे |
| **आरोपी** | १.अमोल उर्फे फन्ना छगन खंडाळे,वय-३२,रा.पर्वती दर्शन,पुणे २.आनंद हनुमंत काळे,वय-३७ वर्षे,रा.तळजाई वसाहत,सहकारनगर नं.१,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०७/२०१७ रोजी १३/०० वा. राजर्षी शाहु बस स्थानक स्वारगेट,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम हे लेबर कॅम्प,राजर्षी शाहु बस स्थानक जवळ स्वारगेट,पुणे येथील मिथुन विश्वास यांचे लेबरचे रूम मध्ये येवुन दारू पित असताना,त्याठिकाणी झोपलेला लेबर नामे आसित आदिर गायिन,वय-२१,रा.लेबर कॅम्प,स्वारगेट स्टॅण्डचे मागे,पुणे हा त्याचेकडे डोळे मोठे करून बघितल्याचा राग येवुन,त्याचे बाजुस असलेल्या सिमेंटच्या रिकामया पोत्याखाली लपविलेले धारधार लोखंडी कोयत्या सारखे हत्यार बाहेर काढुन,तु किसको आँख दिखा रहा है। मै अभी तेरेको जानसे मार डालता असे म्हणुन आसित गायिन यांचे मानेवर डावे बाजुस उजव्या हातावर वार करून,त्यास गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. व्ही आर गौड. ९९२१३७२२७७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे ३५२/१७,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट ११९/१७७ |
| **फिर्यादी** | उमेश पेडगांवकर,वय-३४,रा.थेरगांव,पुणे |
| **आरोपी** | गणेश दौलप्पा कनवळे,वय-३५,रा.रूपीनगर,निगडी,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०७/१७ रोजी ०१/४५ वा. लक्ष्मी चौकापासुन जवळच मातोश्री कार एक्सेसरीज समोर वाकड हिंजवडी रोड,हिंजवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचा मेव्हणा नागेश शिवाजी जोशी,वय-२५,रा.वर्धमान ध्रुव अपार्ट. रत्नदिप कॉलनी,डांगे चौक,थेरगांव,पुणे याचे मोटार सायकलला जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. देशमुख |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३१२/१७,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | रामचंद्र कालेकर,वय-७०,रा.शुक्रवार पेठ,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०७/१७ रोजी दु.१२/३० ते १४/१५ वा.चे दरम्यान ४१२/३१८,शुक्रवार पेठ, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख व सोन्याचे दागिने असा एकुण ५,०४,०००/- रु किमतीचा ऐवज दिवसा घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. गायकवाड ९८२३९३८५५१ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे २६८/१७,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | सौ.नौशाबा अन्सारी,वय-३२,रा.ढोले पाटील रोड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात महिला |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०४/१७ रोजी १६/०० वा.साधु वासवानी चौक,बंडगार्डन पुणे येथे ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात महिलेने फिर्यादी यांना फोन करून मी खाजगी नामांकीत बँकेतुन बोलत आहे असे सांगुन,फिर्यादी यांची फसवणुक करण्याचे उद्देशाने त्यांचे क्रेडीट कार्डची गोपनीय माहिती विचारून त्याव्दारे फिर्यादी यांचे बँकेतील खात्यावरून एकुण १४,९७६/- रूपये ऑनलाईन ट्रान्झेक्शन करून फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. मुजावर ९८८११११६४८८ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ३९१/१७,भादविक ४२०,३२३,१७०,३४ |
| **फिर्यादी** | हर्षत अगरवाल,वय-२७,रा.हडपसर,पुणे |
| **आरोपी** | दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०७/१७ रोजी २०/४५ ते २१/३० वा. रुणवाल सिगल सोसा.हांडेवाडी रोड हडपसर,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहते सोसायटीचे पार्किंग मध्ये असताना,यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचेजवळ येऊन त्यांना पोलीस असल्याची बतावणी करुन,फिर्यादी यांनी दारु पिऊन दुस-याचे पार्किंग मध्ये गाडी का लावली अशी विचारणा करुन तुम्हाला २४,०००/- रुपये दंड भरावा लागेल असे बोलुन,फिर्यादीस हाताने मारहाण करुन त्यांचेकडुन १९,४००/- रुपये घेऊन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. शिंदे ९८२३९७८६६७ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे २८५/१७,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | सुनिल जगदाळे,पो.उप.निरी. कोंढवा पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | १.निखील राजेंद्र मोदानी,वय-२७,रा.बिबवेवाडी,पुणे २.समीर विजय दत्ता,वय-३२,रा.कल्याणी नगर,पुणे ३.अमर संपत्ती बिराजदार,वय-३५,रा.आंबेगांव-खुर्द,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२१/०७/१७ रोजी १०/३० वा.होम कॉर्पोरेशन ॲण्ड असोशिएट्स,सनं.२५,दोराबजी मॉल समोर महमदवाडी, पुणे येथे |
| **तपशिल** | कोंढवा पो स्टे अ.मयत रजि.नं.१०५/१७,सीआरपीसी १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करता,यातील नमुद इसम बांधकाम कंपनीचे मालक व सुपरवायजर यांनी होम कॉर्पोरेशन ॲण्ड असोशिएट्स,सनं.२५,महमदवाडी,पुणे येथे बांधकाम चालु असलेल्या ठिकाणी मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट,सुरक्षित जाळी, सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता,हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,यातील बिगारी कामगार महमद ईकबाल आलम,वय-२२,रा.लेबर कॅम्प,होम कॉर्पोरेशन ॲण्ड असोशिएट्स,सनं.२५,दोराबजी मॉल समोर महमदवाडी,पुणे हा व इतर कामगार काम करीत असताना,सदर प्रोजेक्टचे दक्षीण बाजुचे २७ फुट टेकडीचे उंचीची दगड मातीचा भाग कामगारांवर कोसळुन,त्यामध्ये महमद आलम हा त्याखाली गाडला जावुन मयत झाला. तसेच इतर दोन कामगार हे जखमी झाले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.ए एम सोनवणे |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे २१७/१७,भादविक २८५,२८६,३३७,३३८,४२७ |
| **फिर्यादी** | दिलीप चव्हाण,वय-४६ वर्षे,रा.केशवनगर,मुंढवा,पुणे. |
| **आरोपी** | शहीद प्रदिप इंडियन गॅस एजन्सी,सनं.११२/११३,शॉप नं.४,दळवी हाईट्स यांचे अधिकारी व कर्मचारी (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०७/२०१७ रोजी, २२/४५ वा.ते दि.२१/०७/२०१७ रोजी रात्रौ ००/३० वा.चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे शहीद प्रदिप इंडियन गॅस एजन्सी या एजन्सीचा गॅसचे ग्राहक आहेत. त्यांनी दि.२०/७/१७ रोजी १६/०० वा. सदर गॅस एजन्सी कडुन इंडियन गॅस सिंलेडर घेतला असातना,गॅस एजन्सीचे अधिकारी व कर्मचारी यांनी ज्वलनशील व स्फोटक असणा-या गॅस सिंलेडरची गऴती तपासुन न देता,तो निष्काऴजीपणे फिर्यादीस दिल्यामुळे गॅस सिंलेडर मधुन गऴती होऊन,तो रात्रौ ००/३० वा. अगोदर गेलेली लाईट अचानक आल्याने,सदर गऴती होत असलेल्या सिंलेडरने पेट घेवुन,फिर्यादी यांचे आईस व दोन मुलीस गंभीर जखमी करण्यास तसेच फिर्यादी यांना किरकोळ जखमी होण्यास कारणीभुत होऊन,सदर आगीमध्ये फिर्यादी यांचे घरातील सामानाचे आर्थिक नुकसानीस कीरणीभुत झाले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.व्ही.घाटगे ९९२३४२१३३१ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे २६८/१७,भादविक ४०६,४२०,३४ |
| **फिर्यादी** | दिलीप अनुसे,वय-५५ वर्षे,रा.मुंजाबा वस्ती,धानोरी,पुणे |
| **आरोपी** | १.दत्तात्रय रामचंद्र मोरे २.विजय रघुनाथ मोरे,रा.नवी सांगवी पुणे (अटक) व इतर एक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २०/०५/२०१४ रोजी ते आज दिनांक २२/०७/२०१७ रोजी पर्यंत पुणे विद्यापीठ परिसर पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांचे मुलगा व सुनेसाठी क्लार्क पदाचे नोकरीचे अमिष दाखवुन,त्यांचा विश्वास संपादन करून त्यांचेकडुन एकुण ४,८०,०००/- रूपये घेवुन,त्यापैकी १,५३,०००/- रूपये परत केले. तसेच फिर्यादी यांचा मुलगा व सुन यांना नोकरीस न लावता फिर्यादी यांची एकुण ३,२७,०००/- रूपयांची फसवणूक केली आहे. त्याच प्रमाणे फिर्यादी यांचेबरोबर निखील राम लोखंडे,वय-२७ वर्षे,रा.अशोकनगर,भोसरी,पुणे हे व इतर लोकांना सुध्दा नोकरी लावुन देतो म्हणुन त्यांचेकडुन पैसे घेवुन,फिर्यादी यांची फसवणुक केल्याचे समजले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. संदेश केंजळे |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**